# ज्ञानप्रबोधिनीत सायबर जनजागृती अभियान



**पुणे (प्रतिनिधी)**

गॅंधार मिडिया न्यूज

सायबर गुन्ह्यांचे वाढते आव्हान लक्षात घेऊन संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून बचावाचे धडे ज्ञानप्रबोधिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आले. संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे निरसन करून घेतले.

ससाणेनगर येथील ज्ञानप्रबोधिनी विद्यालयात क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' या उपक्रमांतर्गत सायबर जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्राचार्या शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख विलास वाणी आणि प्रा. मनिषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्सनी हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविला.

सायबर वॉरियर्सनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षेचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य रवींद्र वाघ, अध्यक्ष स्मिता वाघ, पर्यवेक्षक अभय पाटील तसेच संस्थेचे संस्थापक रतन माळी यांचे सहकार्य लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करण्याचे आणि सायबर सुरक्षेबाबत सदैव सतर्क राहण्याचे आवाहन केले.